## पाऊस धारा

क्षण क्षण सारे होता धुसर ।
पापण्यातुनी दाटती पाझर ॥
व्याकुळ कृष्णमेघ सावळे ।
त्या ओढ वसुंधरेची निरंतर ॥
सृष्टीचे रूप भिजले मनोहर ।
तोषविणारा मृद्गंध अनावर ॥
लपंडाव तो ऊन सावल्यांचा ।
मोहवितो मना मनास निरंतर ॥
चिंब चिंब ओल्या पाऊस धारा ।
सुखद सरींची रिमझिम सुंदर ॥
आसक्त ओढ प्रीत सखीची ।
तन मन हृदया लागे चिरंतर ॥
जरी सुख दु:खाची मेघ उंबरी ।
प्रीत भावनांचे अंतरी गहिवर ॥
ऋतु ऋतुंचे सोहळेच लाघवी ।
कृपाळू, कृपावंत तो दिगंबर ॥


वि. ग. सातपुते
9766544908


